# हारण्याची वेळ होती

हारण्याची वेळ होती जिंकलो पण डाव तेव्हा
सोसता आनंद होतो का तुझा तो घाव तेव्हा?।१
जवळ माझ्या धन नसते पण तरी मी धनिक होतो
माणसे का पण अशी देती मला तो भाव आता ।२
मी दिले सोडून सारे का असे गणगोत सारे
लावते त्याचेच का मी बोचणारे नाव आता ।३
सूर त्यांचे वेदनांचे लागले माझ्या मनाला
गीत तेव्हा छेडता तू का मनी तो भाव आता ।४
सागरा शब्द तुझा हा अंतरी रुतला कसा बघ
लाट येते ती किनारी चालते अन् नाव आता ।५।

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर